# कोणाची शिवभक्ती, तर कोणाची विष्णुभक्ती----

निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या की निवडणुकीचे बिगुल वाजल्याचे मथळे वृत्तपत्रांत येऊ लागतात. पण त्या आधीच लोकसभेच्या २०१९ च्या निवडणुका जसजशा जवळ येऊ लागल्या आहेत, तसतसे राजकीय पक्ष त्यांच्या परीने ढोल, ताशे, नगारे वाजवू लागले आहेत. अजून त्यांच्या रणभेरी झाल्या नसल्या, तरी हे निवडणुकीचे पडघम यावेळी काही वेगळेच बोल वाजवताना दिसतात. मुखी धर्मनिरपेक्षतेचे नाम असले, तरी ध्यान मात्र वेगळ्याच देवाचे चालू आहे.

कर्नाटकातील सरकारस्थापनेच्या वेळी भारतीय जनता पक्ष विरोधकांचा देशपातळीवरील मेळावा झाला. हातात हात घालून भाजपाविरोधाचे गाणे सर्वांनी गायले. एकेकाळी देशात काँग्रेसविरोधक एकत्र आले होते, त्याचप्रमाणे यावेळी भाजपाविरोधक एकत्र येतील असे बोलले गेले. प्रत्यक्षात तसे होऊ शकेल की नाही, ते सध्याच सांगणे कठिण असले, तरी राज्य व केंद्र पातळीवर एकच धोरण ठेवणे प्रादेशिक व छोट्या पक्षांना शक्य होईल का याची शंकाच आहे. मात्र जो तो पक्ष आपआपल्या परीने मतदार मिळवणे आणि मतदार टिकवणे यासाठी जोरदार प्रयत्न करू लागला आहे. भारतीय जनता पक्षाने २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत विकास व भ्रष्टाचार मुक्तीचा नारा दिला होता. लोकसभेत त्या पक्षाला स्पष्ट बहुमतही मिळाले. पण त्याशिवाय हिंदुत्वाचा(छुपा) मुद्दा वारंवार येतच गेला. आता त्यांच्या मतपेढीवर हल्ला करायचा, तर भ्रष्टाचाराच्या आरोपांव्यतिरिक्त त्यांच्या हिंदुत्वाच्या मुद्द्याला तोंड देणारा कोणता

मुद्दा घ्यायचा याचा विचार विविध राजकीय पक्षांनी केला आणि आज तरी सर्वचजण त्यांच्या परीने हिंदू मतदारांना खूष करण्याच्या प्रयत्नात दिसतात.

भाजपाविरोधात आघाडी झाली, तर नेतृत्व आपल्याकडेच येईल असे काँग्रेस धरून चालली आहे. तसाही तोच अखिल भारतीय स्तरावरील, सर्वात जुना पक्ष आहे. इतके दिवस त्या पक्षाची धुरा सोनिया गांधींकडे होती, ती नुकतीच त्यांचे सुपुत्र राहुल गांधींकडे आली आहे. त्यांनीही सभांचा सपाटा लावला असून आरोप, निदर्शने यांची धूम चालू केली आहे. ते हिंदी बरे बोलू शकतात, ही माताजींपेक्षा त्यांची जमेची बाजू आहे. लोकांमध्ये मिसळून त्यांच्याशी संवाद करतानाच त्यांच्या भावनांना हात घालण्यासाठी त्यांनी त्यांच्या दौऱ्यांच्या वेळी त्या त्या ठिकाणच्या मंदिरांना भेटी देण्याचा सपाटा लावला आहे. मी शिवभक्त आहे, असा नारा लावत त्यांनी गुजरातच्या निवडणुकीपासून स्थानिक मंदिरांत दर्शनास सुरुवात केली. त्यानंतर मानसरोवराची यात्रा केली आणि त्या यात्रेचे बरेच फोटो समाजमाध्यमांवर टाकून त्या दौऱ्याची आणि पर्यायाने आपण हिंदू असल्याची, भक्त असल्याची बरीच टामटुम केली. भाजपाच्या रामभक्तीला त्यांनी त्यांच्या शिवभक्तीने उत्तर देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. काँग्रेसची धर्मनिरपेक्ष प्रतिमा त्यामुळे डळमळू लागली की काय अशी शंका येण्यासारखे त्यांचे वर्तन आहे. शाहबानो प्रकरणी मुस्लिमांना खूष करण्यासाठी राजीव गांधींनी मुल्ला मौलवींना खूष करण्याचे धोरण ठेवले होते. आता त्यांचे सुपुत्र राहुल जरा वेगळा राग आळवताना दिसतात. मुस्लिम मतांची मिरासदारी वाटणारा काँग्रेसचा इतिहास. पण गुलाम नबी आझाद यांच्या ‘ काँग्रेसमधील नेते आता आपल्याला प्रचाराला बोलवत नाहीत’, या वक्तव्यामुळे मुस्लिम नेत्यांना काँग्रेसमध्ये असुरक्षित तर वाटत नाही ना? आणि तसे खरेच असेल, तर काँग्रेसने अनुसरलेला सौम्य हिंदुत्वाचा मार्ग याला कारण नाही ना, याचा विचार केला पाहिजे. काँग्रेस भाजपाच्या आक्रमक हिंदुत्वाचा सामना सौम्य हिंदुत्वाने करू लागला आहे का?

मी हिंदू आहे, असे आता काही काँग्रेसी नेते उघडपणे म्हणू लागले आहेत. शशी थरूरसारखे उघडपणे आपण हिंदू असल्याबद्दल अभिमान व्यक्त करू लागले आहेत. शबरीमला हे केरळमधील प्रसिद्ध मंदिर. हे मंदिर न्यायालयाने सर्व महिलांना खुले केल्यावर समानता विरुद्ध परंपरा असा वाद रंगला आहे. १० ते ५० या वयोगटातील महिलांना कायदेशीरपणे मंदिरप्रवेश खुला झाला

असला, तरी प्रत्यक्षात दर्शनाला गेलेल्या महिलांना प्रवेश करणे दुरापास्तच झालेले आहे. न्यायालयाने मंदिरप्रवेशाला परवानगी दिली असली, तरी उजव्या संघटना या निर्णयाच्या विरोधात आहेत. परंपरा पाळली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. यावर केरळ काँग्रेसने मौन पाळले आहे. केरळ सरकारला विरोध करण्यासाठी काँग्रेसचे चेन्निथळा यांनी महिलांच्या मंदिरदर्शनाच्या विरोधातच टीकाटिप्पणी केली आहे.  या प्रकरणी न्यायालयाची तळी उचलून सुधारणावादाला खतपाणी घालावे, तर कट्टर, परंपरावाद्यांना राग येणार, तर परंपरावादाच्या बाजूने उभे राहावे, तर धर्मनिरपेक्षता, समानता या मूल्यांना काळे फासले जाणार या दुग्ध्यात काँग्रेस आहे.

रा.स्व. संघाचे प्रमुख मोहनजी भागवत यांनी उघडपणे राममंदिरासाठी कायदा करण्याचे आवाहन केल्यामुळेही काँग्रेसची पंचाईत झाली आहे. राममंदिराची दारे उघडून तेथे पुजाऱ्याची नेमणूकही काँग्रेसच्याच काळात झाली. बाबरी ढाच्याचे पाडकामही काँग्रेसच्याच काळात झाले. त्यामुळे उघडउघड राममंदिरासंबंधी काही बोलण्याऐवजी शंकरभक्तीचा मार्ग राहुल यांनी पत्करलेला दिसतो.

राममंदिराचा प्रश्न ज्या उत्तर प्रदेशात आहे, त्या राज्यातील बराच काळपर्यंत राज्य करणाऱ्या समाजवादी पक्षाचे मुलायमसिंग तर मुल्ला मुलायम म्हणूनच प्रसिद्ध झाले होते. त्यांनी मुस्लिमांची एक मतपेढी तयार केली होती. पण १९१४ची लोकसभा निवडणूक आणि २०१७ मधील विधानसभा निवडणुकीत समाजवाद्यांचा  सफाया झाल्यावर आता या पक्षाची धुरा वाहणारे मुलायमसिंगांचे चिरंजीव अखिलेश यादव यांनाही त्यांच्या मुस्लिम तुष्टीकरणाचा फेरविचार करावा लागत आहे. समाजवाद्यांचा कट्टर  शत्रू असलेल्या मायावतींच्या बसपाबरोबर युती करून त्यांनी फुलपूर, कैराना आणि गोरखपूरच्या पोटनिवडणुका जिंकल्या. पण मायावतींवर किती भरवसा ठेवता येईल हा प्रश्न असून ही युती टिकवणे अवघड आहे याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. लोकसभा निवडणुकीनंतर अखिलेश यांनी कृष्णमंदिर बांधण्याचा विचार मांडला होता. कृष्ण यादव कुळातील म्हणून त्यांनी कृष्णपूजा आरंभली , त्यांना यादववादाबाहेर येता येत नाही म्हणून त्यांच्यावर टीका झाली. त्यामुळे त्यांनी नंतर कृष्णभक्ती मागे टाकली आणि विष्णुभक्तीच्या मागे ते सध्या आहेत. समाजवादी पक्षाच्या मतपेढीवर

रामजन्मभूमी प्रकरणाने परिणाम होतो, जे निष्ठावंत समाजवादी आहेत, तेही रामामुळे समाजवादी पक्षाची साथ सोडतात, हे लक्षात आल्यावर भाजपाच्या रामभक्तीला अखिलेश यांनी विष्णुभक्तीने उत्तर द्यायचे ठरवलेले दिसते. राममंदिराला विरोध करावा, तर मतदार नाराज होतात, राममंदिराची बाजू घ्यावी, तर भाजपाचे समर्थन होते, अशी इकडे आड, तिकडे विहीर अशी समाजवादी पक्षाची स्थिती असल्याने राममंदिरासंबंधी काही न बोलणे बरे असा सावध पवित्रा त्यांनी घेतला आहे.

भाजपाविरोधी आघाडीतील धडाडीच्या नेत्या ममता बॅनर्जी. बंगालमधून कम्युनिस्टांना हकलून लावण्याची कर्तबगारी त्यांच्या नावावर जमा आहे. दुर्गापूजा हा बंगालमधील महत्त्वाचा सण. गावोगावी, गल्लोगल्ली मंडप उभारून दुर्गेच्या प्रतिमेचे पूजन केले जाते. मागच्याच वर्षी दुर्गापूजा आणि मोहरम एकाच वेळी आल्याने त्यांनी ताबुतांसाठी दुगापूजा विसर्जन नंतर करा असा फतवा काढला आणि समस्त जनतेचा रोष ओढवून घेतला होता. यंदा मात्र त्यांना एकदम दुर्गेची महती कळली आहे! ममता यांनी स्वतः दोनतीन दुर्गास्तवने लिहिली असून त्यांनी दुर्गापूजा मंडपांना स्वतः भेटी दिल्या. दुगापूजांना भेटी देऊन त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी दर पूजासमितीस १० हजार रुपयांची सरकारी खिरापतही वाटली आहे.

महाराष्ट्रातील सत्तेत सहभागी शिवसेना पहिल्यापासूनच विरोधी पक्षाची भूमिका वठवत आहे. आपण हिंदुत्ववादी म्हणून सरकारमध्ये सामील झालो असे म्हणणारी शिवसेना आता राममंदिर प्रकरणी आक्रमक झाली आहे. नुकत्याच झालेल्या शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ‘तुम्ही राममंदिर बांधत नसाल, तर आम्ही अयोध्येत जाऊन ते बांधू’, असे आव्हानच भाजपाला दिले आहे. रा.स्व. संघाचे प्रमुख मोहनजी भागवत यांनी राममंदिराच्या बांधणीसाठी कायदा करावा असा सल्ला दिला आहे. त्याच्यापुढे जाऊन आपण कसे आक्रमक होऊ शकतो, हे उद्धव यांना दाखवून द्यायचे आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीआधी दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आणि अखेर कोणालाच बहुमत मिळाले नाही. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर एकत्र येऊन शिवसेना सत्तेत सहभागी तर झाली, पण -- तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना अशी त्या पक्षाची स्थिती आहे.

त्यामुळे सत्तेची फळे तर चाखायची, पण आपल्या पक्षाची मिजास राखायची असा शिवसेनाचा पवित्रा आहे. त्यासाठी ही रामभक्ती आणि राममंदिराच्या बांधकामाची घाई.

यातील काँग्रेसला देशभरात काही प्रमाणात अस्तित्व आहे. पूर्वीचे दिवस परत यावेत यासाठी त्यांचा प्रयत्न चालू आहे. पण जेथे स्वबळावर सत्ता स्थापता येत नाही, त्या राज्यांत प्रादेशिक पक्षांशी युती करून पूर्वी काँग्रेसने आणि नंतर भाजपाने सत्ता संपादन केली. गेल्या वेळी मोदीलाटेमुळे भाजपाला केंद्रात स्पष्ट बहुमत मिळाले आणि काँग्रेसचा धुव्वा उडाला. येत्या निवडणुकीत प्रस्थापित सत्तेच्या विरोधाला भाजपाला तोंड द्यायचे आहे. दुष्काळ, उतरता रुपया, तेलाचे चढते दर यामुळे जनता मेटाकुटीला आली आहे. नोटाबंदी आणि जीसटीमुळे आर्थिक परिस्थितीचा बोजवारा उडाला आहे अशी विरोधकांची भूमिका आहे. त्यामुळे गेल्यावेळेइतकी येती निवडणूक सत्ताधाऱ्यांना सोपी नाही. या पार्श्वभूमीवर भाजपाच्या हिंदुत्वाच्या भूमिकेला सुरुंग लावण्यासाठी आणि हिंदू मते आपल्याकडून जाऊ नयेत यासाठी विविध पक्ष त्यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीपेक्षा वेगळी भूमिका घेताना दिसतात. येनकेनप्रकारेण हिंदू मते जिंकण्याचा हा त्यांचा प्रयत्न किती साध्य होईल? लवकरच कळेल. घोडामैदान फार लांब नाही.

**----मानसी मोकाशी**